**कृपया प्रसिध्दीसाठी -** **20 मार्च 2012**

## माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मंगळवार, 20 मार्च 2012 रोजी पुणे येथील पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

**पुणे, मंगळवार :** ''भारत सरकार, महाराष्ट्र सरकार आणि कुष्ठरोग निर्मूलन व कुष्ठपीडितांचे सशक्तिकरण यासाठी काम करणा-या सर्वांनाच धोक्याचा इशारा मिळाला आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश व बिहार या तीन राज्यात कुष्ठरोगाची नव्याने लागण झालेले रुग्ण असल्याचे आढळून आले आहे. वर्ष 2005 मध्ये भारत सरकारने देशातून कुष्ठरोगाचे संपूर्ण निर्मूलन झाल्याचा दावा केला होता. तो यामुळे सपशेल खोटा ठरला आहे,'' असे निवेदन माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत केले. इंटरनॅशनल लेप्रसी युनियन (ILU) चे अध्यक्ष डॉ. शरद गोखले हेही यावेळी पत्रकार परिषदेत उपस्थित होते.

याबाबत तपशीलवार माहिती देताना श्री. राम नाईक म्हणाले, ''कुष्ठरुग्णांना योग्य व पुरेशा वैद्यकीय सेवा मिळत नाहीत, एवढेच नव्हे तर त्यांच्या सशक्तिकरणाची गरज आहे, कुष्ठरुग्णांच्या समस्यांबाबत केवळ महाराष्ट्र सरकारच नव्हे तर केंद्र सरकारही प्रतिसाद देत नाही, असे लक्षात आल्यामुळे मी 5 डिसेंबर 2007 रोजी कुष्ठपीडितांच्या सशक्तिकरणासाठी राज्यसभेत विनंती अर्ज दाखल केला होता. इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे डॉ. शरद गोखले, नॅशनल फोरम ऑफ लेप्रसीचे पद्मश्री डॉ. पी. के. गोपाल, कुष्ठ रोग निवारण समितीचे श्री. उदय ठकार, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे श्री. बळीराम तांबडे व संजयनगर रहिवासी संघाचे श्री. भीमराव मधाळे यांनीही माझ्यासोबत या विनंती अर्जावर स्वाक्ष-या केल्या होत्या. राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीने याबाबतचा आपला अहवाल 24 ऑक्टोबर 2008 रोजी संसदेत सादर केला. त्यानंतर 22 नोव्हेंबर 2010 रोजी या अहवालावरील कृती अहवालही संसदेत सादर झाला. मूळ अहवालात तसेच कृती अहवालातही कुष्ठपीडितांच्या सशक्तिकरणासाठी अनेक शिफारसी करण्यात आल्या होत्या. या शिफारसी वेगवेगळ्या मंत्रालयांशी संबंधित असल्यामुळे यासंदर्भात चर्चा करण्यासाठी 1 जानेवारी 2011 रोजी पत्राव्दारे आम्ही पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची वेळ मागितली. त्यानंतर 28 जानेवारी, 10 फेब्रुवारी व 10 मार्च 2011 रोजी तीनदा स्मरणपत्रे पाठविली. परंतु पंतप्रधानांकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने अखेर 14 सप्टेंबर 2011 रोजी देशाच्या सर्वोच्च महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांची भेट घेऊन त्यांना साकडे घातले''.

महामहीम राष्ट्रपतींना शिष्टमंडळाने पुढील प्रमुख मागण्या केल्या :-
(1) कुष्ठपीडितांच्या सशक्तिकरणासाठी त्यांचे सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करणारे सर्वंकष धोरण ठरविणे, (2) मूळ विनंती अर्जात नमूद केलेल्या देशातील 16 वेगवेगळ्या कायद्यांमध्ये सुधारणा करणे, (3) कुष्ठपीडितांचा उदरनिर्वाह भत्ता वाढवून दरमहा रु. 2,000/- करणे व देशभरातील सर्व राज्यांमधील कुष्ठपीडितांना समान भत्ता देणे, (4) देशातील अपंग व दारिद्र्य रेषेखालील लोकांना

मिळणारे सर्व सामाजिक व आर्थिक लाभ कुष्ठपीडितांनाही देण्याची तरतूद करणे, (5) कुष्ठपीडितांच्या वस्त्यांना नागरी सुविधा देणे, (6) कुष्ठपीडितांच्या मुलांना उच्च शिक्षण व शिष्यवृत्त्या देण्याची तरतूद करणे, (7) कुष्ठपीडितांनी उत्पादित केलेल्या वस्तूंवरील व्हॅट काढून टाकणे, (8) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या राज्य व जिल्हा समित्यांवर कुष्ठपीडितांना प्रतिनिधीत्व देणे, तसेच राष्ट्रीय पुनर्वसन मंडळावरही कुष्ठपीडितांचा प्रतिनिधी नियुक्त करणे, (9) देशभरात झालेली कुष्ठरुग्णांची वाढ मोजण्यासाठी आणि / किंवा कुष्ठरोगाच्या निर्मूलनाच्यादृष्टीने नव्याने राष्ट्रीय सर्वेक्षण करणे, (10) कुष्ठसेवांमध्ये कुष्ठपीडितांचा सहभाग वाढावा यासाठी आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करणे, आदी.

''महामहीम राष्ट्रपतींनी कुष्ठपीडितांच्या मागण्यांमध्ये लक्ष घालण्याचे आश्वासन दिले तथापि, अजूनही कोणताही ठोस निर्णय झालेला दिसून येत नाही. तर दुसरीकडे अलिकडेच म्हणजे 13 मार्च 2012 रोजी आरोग्य मंत्री श्री. गुलाम नबी आझाद यांनी राज्यसभेत जगभरातील कुष्ठरुग्णांमध्ये आपल्या देशातील कुष्ठरुग्ण मोठ्या संख्येने म्हणजेच 55 टक्के असल्याची धक्कादायक माहिती दिली. आपल्या देशात 1,26,800 कुष्ठपीडित असून त्यापैकी बहुसंख्य उत्तरप्रदेश, बिहार व महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्र राज्याचे कुष्ठ अधिकारी डॉ. प्रदीप गायकवाड यांनीही हल्लीच राज्यातील 19 जिल्ह्यांमध्ये 2,440 नवे कुष्ठ रुग्ण मिळाल्याची धक्कादायक माहिती दिली. ही धक्कादायक माहिती हाती आल्यामुळे तरी महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकारने जागे होऊन उचित पावले उचलावित अशी अपेक्षा आहे. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने राज्यसभेच्या विनंती अर्ज समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी करणे जसे गरजेचे आहे, तसेच त्यासाठी केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशभरातील या क्षेत्रात काम करणा-या अशासकीय स्वयंसेवी संघटनांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे. त्यासाठी इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे अध्यक्ष डॉ. शरद गोखले व नॅशनल फोरम ऑफ लेप्रसी अफेक्टेड पर्सन्सचे अध्यक्ष डॉ. पी. के. गोपाळ यांनी पुढाकार घ्यावा, अशी माझी त्यांना कळकळीची विनंती आहे,'' असे आवाहनही श्री. राम नाईक यांनी या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.

''इंटरनॅशनल लेप्रसी युनियनने राज्यातील दापोडी, पंढरपूर, कोल्हापूर, अहमदनगर व उल्हासनगर या पाच कुष्ठ वसाहतींमध्ये राबविण्यासाठी कृती योजना तयार केली आहे. तिथे ते बालविकास केंद्र चालविणार असून त्याद्वारे मुलांचे शिक्षण, आरोग्य व सकस पोषण याकडे लक्ष पुरविले जाईल. वस्त्यांमध्ये मानवी हक्कांबाबत जागृती निर्माण केली जाईल, वस्त्यांतील महिला कुष्ठपीडितांना विशेष मदत करुन त्यापैकी कुष्ठपीडितांचे नेतृत्त्व करणा-या महिलांना सन्मानित केले जाणार आहे,'' अशी माहितीही श्री. नाईक यांनी यावेळी दिली.

**(कार्यालय सचिव)**